# गोंदिया जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर पालकांच्या उपन्नाचा व सहभागाचा होणारा परिणाम

**डॉ.सरीता उदापुरकर**
सहाय्यक प्राध्यापक (वाणिज्य)
न.मा.द.महाविद्यालय,
गोंदिया.

---

***सारांश*** *: विद्यार्थ्यांच्याकामगिरीवर आणि शैक्षणिक विकासावर त्यांच्या पालकांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा परिणाम होत असतो. या अभ्यासात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरी, तसेच पालकांचे उत्पन्न व पालक विद्यार्थी संबंध यावर होणाऱ्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा परिणाम याचे मूल्यमापन केलेले आहे. महाराष्ट्र राज्यातील पूर्वेस असलेल्या गोंदिया जिल्ह्यातील 70 महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी येथे प्राधान्य देण्यात आले. लिकर्ट स्केल पद्धतीचा वापर करून संरचित प्रश्नावलीच्या येथे माहिती उपयोग संकलनासाठी उपयोग करण्यात आला. त्यात पालकांच्या उत्पन्नाच्या स्तराचा परिणाम आणिविद्यार्थ्यांच्याशैक्षणिक कामगिरीचे काही घटक अभ्यासले गेले त्यात विद्यापीठ परीक्षेतील त्यांच्या प्राप्त गुणांचाही विचार करण्यात आला आहे. प्रोत्साहित व उत्साहवर्धक कुटुंबामध्ये विद्यार्थ्यांच्याकामगिरीवर प्रचंड प्रभाव पडलेला दिसून येतो. तर जवळपास 30 टक्के कुटुंबामध्ये याला नकार देण्यात आला 50 टक्क्यापेक्षा जास्त कुटुंबामध्ये पालकांच्या उत्पन्नाचा विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणाऱ्या परिणामास नकार देण्यात आला. म्हणून या अभ्यासावरून असे निदर्शनास येते की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती उंचावण्यासाठी त्यांच्या पालकांचा प्रोत्साहन पूर्ण व उत्साहपूर्ण सहभाग हा त्यांच्या उत्पादनाच्या स्तरापेक्षा जास्त महत्त्वपूर्ण असतो. म्हणून शोधकर्ता पालकांना असा सल्ला देतो की, आपल्या पाल्यांना नेहमी शैक्षणिक प्रगतीसाठी प्रोत्साहित करावे. आणि त्यांचे मनोबल उंचाविण्याचा प्रयत्न करावा. ज्यामुळे त्यांचे भावनिक स्थैर्य राखले जाऊन आत्मविश्वास वाढेल व त्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर सकारात्मक परिणाम झालेला दिसून येईल.*

***मुख्य शब्द–*** *पालकांचे उत्पन्न, पालकांचा सहभाग, शैक्षणिक कामगिरी.*

---

**प्रस्तावना :**

साधारणपणे समाजात असे दिसून येते की, श्रीमंत व्यक्ती आपल्या मुलांच्या प्रगतीसाठी गरीब व्यक्ती पेक्षा जास्त खर्च करीत असतात. हा त्यांच्या मुलावर होणारा खर्च त्यांच्या भविष्याची गुंतवणूक असते, त्यांचे आरोग्य, शिक्षण आणि त्यांच्यावरील संस्कार हे त्यांचे भवितव्य ठरवीत असतात. परंतु पालकांचे उत्पन्न हा एकमेव घटक त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर प्रभावी ठरत नाही तर पालकांच्या त्यांच्या मुलांच्या कार्याविधीत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभागही त्यांच्या कामगिरीवर प्रभाव टाकीत असतात. म्हणूनच संशोधकाने या संशोधनात पालकांचे उत्पन्न व पालकांचा पाल्याच्या कार्यात सहभाग परिणामकारक ठरते किंवा नाही यावर अभ्यास केलेला आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्यातील गोंदिया जिल्ह्याची निवड करून 70 महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या पालकांचा व त्यांच्या पाल्यांच्या येथे अभ्यास केला आहे.

**पूर्व संशोधन आढावा :**

1. कंम्बेल यांच्या एका पुस्तकानुसार पालक नेहमीच आपल्या पाल्यांच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावीत असतात.त्यांचे पाल्यांच्या विकासातही महत्वपूर्ण योगदान असते.त्यांच्या मुलांच्या शिक्षणातील सहभाग हा मुलांवर सकारात्मक परिणाम घडवित असतो.
2. वाकसरफीक, फतिमा की,सोहेल एम एफ,सलिम एम,अलिखान यांच्या लाहोर येथे केलेल्या अभ्यासावरून असे दिसून येते की शैक्षणिक ज्ञान वाढविण्याच्या प्रक्रियेत सक्रीय पालक समाजासाठी व विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक असतात. पालकाचे अभ्यासावर लक्ष ठेवणे अभ्यासाव्यतिरिक्त क्रियांमध्ये सहभाग घेणे किंवा त्यांना प्रोत्साहन देणे यासारख्या विविध उपक्रमांनी पाल्य प्रोत्साहित होऊन त्यांची चांगली व उत्तेजनात्मक कामगिरी करण्यामागे कल वाढतो.
3. डेस फोर्जे सी, आउचर ए यांच्या संशोधनानुसार कुटुंबांचा, सामाजिक स्तर, आईचे शिक्षण, उपलब्ध भौतिक सुविधा, आईचे मानसिक सामाजिक व शारीरिक आरोग्य हे कमी अधिक प्रमाणात विद्यार्थ्यांच्याप्रगतीवर परिणाम करीत असतात.
4. हिल एन, इ टेलर यांच्या एका अहवालानुसार पालक त्यांच्या पाल्यांच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत असतात. त्याचा मुलांच्या शिक्षणातील सहभाग हा पाल्यांच्या प्रगतीत सकारात्मक परिणाम घडवीत असतात. शैक्षणिक प्रगतीत वाढ होण्याच्या प्रक्रियेत सक्रीय पालक समाजासाठी व विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी महत्वपूर्ण असतात.  पालकांचे पल्ल्याच्या अभ्यासावर लक्ष ठेवणे, अभ्यासाव्यतिरिक्त इतर उपक्रमांमध्ये सहभाग घेणे प्रोत्साहन देणे. यामुळे विद्यार्थी प्रोत्साहित होऊन त्यांची कामगिरी उत्कृष्ट होण्यामागे कल वाढत जातो कुटुंबांचा सामाजिक स्तर आईचे शिक्षण उपलब्ध भौतिक सुविधा आईचे मानसिक व सामाजिक आरोग्य हे कमी अधिक प्रमाणात मुलांच्या प्रगतीवर परिणाम करीत असतात.
5. लॅरे एक यांच्या एका पुस्तकातील अहवालात मुलांच्या शिक्षणाचे महत्त्व सांगून त्यांना स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजाविण्यासाठीआवश्यक असलेल्या नीतीचा वापर करून त्यांच्या कामगिरीवर नियंत्रण कसे ठेवता येईल हे सांगितले. पाल्ल्याच्या शैक्षणिक कामगिरीवर परिणाम करणाऱ्या विविध घटकांपैकी पालकांचा उत्पन्नाचा तर हा एक महत्त्वपूर्ण घटक असतो हेही सांगितले.
6. मेयर एस ई यांच्या मते एका अनौपचारिक सर्वेक्षणात असे दिसून आले की श्रीमंत पालक असलेल्या पाल्यांचे यश गरीब पालक असलेल्या पाल्यापेक्षा जास्त असते कारण श्रीमंत पालक गरीब पालकांपेक्षा त्यांच्या पाल्यावर व त्यांच्या कामगिरीवर गुंतवणूक करीत असतात. त्यानुसार परिस्थिती चांगली असल्यास देशाच्या प्रशासनाने गरीब विद्यार्थ्यांसाठी किंवा त्यांच्या कुटुंबासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत करावी असे सुचविले आहे.  त्यातच शैक्षणिक आरोग्य सुविधा पुरविण्यात याव्यात असे सांगितले आहे.
7. मॅके सीएच, आय फेलूनी को च्या म्हणण्यानुसार आर्थिक परिस्थिती चांगली असणाऱ्या व सोबतच पाल्यांचे मनोबल वाढवून मार्गदर्शन करणाऱ्या कुटुंबातील पाल्यामध्ये जास्त प्रगती झालेली दिसून येते.
8. हेडरसन एटी, बिरला एन यांच्या प्रकाशीत अहवालानुसार जेव्हा पालक आर्थिकरित्या सक्षम असतात आणि मुलांना समर्थन करतात त्यांच्या पाल्यांच्या कार्यामध्ये सहभागी होतात तेव्हा मुलांच्या प्रगतीचा आलेख वाढत जातो त्यातही पालकांच्या आर्थिक परिस्थिती पेक्षा पालकांचा पाल्याच्या क्रियाकलापामध्ये असलेला सहभाग जास्त महत्त्वपूर्ण दिसून येतो.

**संशोधन पद्धती :**

महाराष्ट्र राज्याच्या पूर्वेस विदर्भातील गोंदिया जिल्ह्याच्या वरिष्ठ महाविद्यालयाच्या एकूण 70 विद्यार्थ्यांची यादृच्छिक पद्धतीने निवड करण्यात आली व त्यांचा या अभ्यासासाठी नमुना म्हणून वापर करण्यात आला व संरचीत प्रश्नावली तयार करून 70 विद्यार्थ्यांकडुनत्या भरून घेतल्या व माहिती

संकलित केली. या प्रश्नावली मध्ये पालकांची आर्थिक परिस्थिती या परिस्थितीचा पल्ल्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर व परीक्षा वर होणारा परिणाम, पालकांचा पाल्याच्या क्रियाकलापात स्वखुशीने घेतलेला सहभाग, सुख समृद्ध कुटुंबातील पाल्या जवळ असलेल्या सुविधा, दैनंदिन कार्यात व्यस्त असलेल्या आईच्या मूल्याच्या अभ्यासाकडे होत असलेले दुर्लक्ष, पालकांच्या उत्पन्नावर अवलंबून असलेले मुलांचे शिक्षण कुटुंबातील मुलांची शैक्षणिक कामगिरी या प्रश्नांना प्राधान्य देऊन त्यांचे प्रतिसाद नमूद करून घेतले. प्रश्नावलीत प्रश्नांची मांडणी करताना त्यांचे प्रतिसाद 4 लिकर्ट स्केल च्यानुसार निश्चितपणे सहमती, सहमती, असहमती, निश्चित पणे असहमती यानुसार घेण्यात आले.

**उद्दिष्टे :**

या अभ्यासाची काही महत्त्वपूर्ण उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

1. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्याशैक्षणिक कामगिरीवर प्रभाव टाकणाऱ्या सर्व घटकांचा अभ्यास करणे.
2. पालकांच्या सामाजिक व आर्थिक स्तरांचा अभ्यास करून त्याचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
3. मुख्यत्वे पालकांचे उत्पन्न पालक–पाल्य संबंध या घटकांची विवेचन करणे.

**माहिती संकलन :**

संरचीत प्रश्नावलीच्या सहाय्याने गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण करून खालील प्रमाणे तक्त्यात माहिती मांडलेली आहे.

| विवरण | निश्चित सहमती | सहमती | असहमती | निश्चित असहमती | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1) पाल्यांच्या विविध कृतीमध्ये पालकांचा सहभाग असतो. | 09 (13 %) | 38 (54 %) | 19 (27%) | 04 (6%) | 70 (100%) |
| 2) श्रीमंत पालक असलेल्या विद्यार्थ्याकडे गरीब पालक असलेल्या विद्यार्थ्यांच्या तुलनेने शिक्षणाच्या सोयी सुविधा जास्त असतात. | 16 ( 23 %) | 31 (44 %) | 20 (29%) | 03 (4%) | 70 (100%) |
| 3) दैनंदिन दिनचर्येत व्यस्त असणाऱ्या आईकडे मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यास वेळ नसतो. | 15 (22 %) | 41 (58 %) | 13 (18%) | 01 (2%) | 70 (100 %) |
| 4) उत्पन्नाचा स्तर निम्न असलेल्या कुटुंबामध्ये आर्थिक संकटाचा शिक्षणावर प्रभाव पडत असतो. | 10 (14 %) | 24 (35 %) | 28 (40%) | 08 (11%) | 70 (100%) |
| 5) श्रीमंत कुटुंबामध्ये पाल्यांची शैक्षणिक कामगिरी व प्रगती जास्त प्रमाणात होत असते. | 05 (7 %) | 12 (18%) | 32 (45%) | 21 (30%) | 70 (100%) |

**चर्चा व निष्कर्ष :**

उपरोक्त तक्त्यावरून असे निदर्शनास येते की पालकांच्या उत्पन्नाच्या स्तराचा विद्यार्थ्यांच्याकामगिरीवर प्रामुख्याने प्रभाव पडत असतो तसेच त्याच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये ते एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. पाल्याचे मनोबल वाढविणे. आर्थिक व भौतिक सुविधा पुरविणे या सर्व बाबींमुळे त्यांची कामगिरी प्रभावित होताना दिसून येते. वरील अभ्यास असलेल्या घटकांचे विश्लेषण व निष्कर्ष खालील प्रमाणे

1. पाल्यांच्या विविध कृतीमध्ये पालकांचा सहभाग – या मुद्द्यावर विविध प्रश्नाद्वारे संकलित केलेल्या माहितीनुसार असे दिसून येते की पन्नास टक्क्यापेक्षा जास्त कुटुंबे यासाठी सहमती दर्शवितात म्हणजेच पाल्याच्या विकासात पालकांचा सक्रिय सहभाग महत्त्वपूर्ण असतो
2. श्रीमंत कुटुंबातील पाल्याकडे गरीब कुटुंबातील पाल्यापेक्षा जास्त सुविधा असतात– वरील तक्त्यावरून असे स्पष्ट दिसून येते की 44 टक्के विद्यार्थी यासाठी सहमती दाखवितात म्हणजेच आर्थिक परिस्थिती वरच उपलब्ध सोयीसुविधा अवलंबून असतात.
3. दैनंदिन दिनचर्येत व्यस्त असलेल्या आईकडे मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक वेळ खर्च करता येत नाही – या अभ्यासावरून असे निदर्शनास येते की ज्या कुटुंबातील आई आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आवश्यक वेळ खर्च करू शकत नाही त्यांची संख्या 50 टक्क्यापेक्षा जास्त आहे यावरून असे निदर्शनास येते की आई आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देत नाही.
4. उत्पन्नाचा स्तर निम्न असलेल्या गरीब कुटुंबांमध्ये आर्थिक संकटे असल्याने शिक्षणाच्या स्तरावर परिणाम होतो.– आर्थिक संकटे येत असलेल्या कुटुंबांच्या पाल्याच्या शिक्षणावर परिणाम होत असतो यावर 40 टक्के विद्यार्थ्यांनीअसहमती दर्शविली आहे तर 35 टक्के विद्यार्थ्यांनीसहमती दर्शविली आहे. यावरून असे दिसून येते की उत्पन्नाचा स्तर हा विद्यार्थ्यांच्याशिक्षणावर कमी प्रभाव पाडत असतो.
5. श्रीमंत कुटुंबामध्ये पाल्ल्यांची शैक्षणिक कामगिरी अधिक प्रभावी असते या अभ्यासावरून असे दिसून येते की उपरोक्त विधानास 45 टक्के पाल्यांनी असहमती दर्शविली आहे म्हणजेच पालकांच्या उत्पन्नाच्या स्तराचा व आर्थिक परिस्थितीचा पाल्ल्यांच्या शिक्षणावर प्रभाव कमी प्रमाणात होत असतात.

यावरून असा निष्कर्ष काढता येतो की गोंदिया जिल्ह्यात पालकांचा पाल्याच्या कामगिरीत व शैक्षणिक प्रगतीत असलेला सहभाग हा त्यांच्या पालकांच्या उत्पन्नापेक्षा जास्त परिणामकारक व प्रभावी ठरतो.

**उपाययोजना :**

1. संशोधकाने वरील लेखावरून पात्याची कामगिरी वाढविण्यासाठी काही उपाय सुचविले आहेत ते खालील प्रमाणे एक पालकांनी पाल्यांना नेहमी प्रोत्साहित करावे जेणेकरून आपले पालक आपल्या सोबत आहेत अशी जाणीव मुलांना होत राहील
2. पालकांच्या प्रोत्साहनाने मुलांचे मनोबल वाढून त्यांच्या मनाला बळकटी मिळेल त्यातून त्यांचे भावनिक स्थैर्य राखले जाईल
3. मानसिक व भावनिक स्थैर्य टिकून राहिल्यामुळे त्याचा शैक्षणिक व व्यक्तिमत्व विकास होऊन त्याचा आत्मविश्वास वाढेल.
4. वाढलेल्या आत्मविश्वासाने पाल्य जास्तीत जास्त चांगल्या पद्धतीने कामगिरी करून आपापल्या क्षेत्रात प्राविण्य मिळविण्याचा प्रयत्न करतील
5. आत्मविश्वास व उच्च मनोबल असलेल्या मानवी संसाधनामुळे देशाच्या आर्थिक विकासात हातभार मिळेल व देश विकासाकडे मार्गस्थ होईल.

## संदर्भ ग्रंथ सूची :


- The Impact of Parental Level of Income on Students Academic Performance in High School in Japan. Chioma Henrietta Machebe, Bernedeth N, Ezegbe, Joseph Onuoha.
- Campbell JR- Raising your child to be gifted: Successful parents speak: Brookline Books/Lumen Editions; 1995 Jan- 25 1995- 196 p-
- WaqasRafiq HM] Fatima T] Sohail MM] Saleem M] Ali Khan M- Parental Involvement and Academic Achievement; A Study on Secondary School Students of Lahore] Pakistan- International Journal of Humanities and Social Science- 2013; 3(8):209 & 23-
- Desforges C Abouchaar A- The impact of parental involvement] parental support and family education on pupil achievement and adjustment: A literature review: DfES Publications Nottingham; 2003-
- Hill NE] Taylor LC- Parental school involvement and children’s academic achievement pragmatics and issues- Current directions in psychological science- 2004;13(4):161 & 4
- Lareau A- Home advantage: Social class and parental intervention in elementary education: Rowman & Littlefield Publishers; 2000
- Mayer SE- Revisiting an old question: how much does parental income affect child outcomes- Focus- 2010;27(2):21 & 6
- Machebe CH] Ifelunni CO- Influence of Parental Socio & Economic Status on academic achievement of Students in Selected Schools in Nigeria: A case Study of Enugu State- Journal of Education and Practice- 2014;5(2):105&10-Kajita] E- (2006)- The Decline in the Academic Level of Japanese Children and the Development of Educational Reform
- Henderson AT] Berla N- A new generation of evidence: The family is crucial to student achievement: National Committee for Citizens in Education; 1994
- Kajita E- The Decline in the Academic Level of Japanese Children and the Development of Educational Reform- 2006
- Davis & Kean PE- The influence of parent education and family income on child achievement: the indirect role of parental expectations and the home environment- Journal of family psychology- 2005;19 (2):294
- Hagiwara Y, Reynolds I- In Japan,1 in 6 children lives in poverty, putting education, future at stake- The Japan Times- 2015 September 10, 2015; Sect- National/Social Issues
- Porumbu D, Necşoi DV- Relationship between Parental Involvement/Attitude and Children’s School Achievements- Procedia & Social and Behavioral Sciences- 2013;76:706 & 10
- Paul AM- Why Parenting Is More Important Than Schools- TIME online- 2012 Oct- 24, 2012- 14½ Lacour M, Tissington LD- The effects of poverty on academic achievement- Educational 2011;6 ¼7½:522 & 7- Research and Reviews
- Shields PM- School and community influences on effective academic instructions- Berkeley, CA: Mr Cutchan Publishing Corp-; 1991
- Bergeson T- Race, poverty and academic achievement 2006 Available from: http://www-doh-wa-gov/SBOH/ESS/documents/Race&Povert y-pdf
- Bergstrom, T., "A Survey of Theories of the Family", Family and Household Economics, Ann Arbor, MI: University of Michigan, 1997.
- Chaudhary C.M., ‘Research Methodology’, Ashish Parnami RBSA Publishers, Jaipur, 2009, Chapter - 1, 2, Pg. 1 - 30. 150
- Dixit K.R., ‘Human Resource Management’, D.V. Bhalerao Publishers, First edition, August 2003, Chapter -1, 14, Pg.1 - 25 and 290 - 299.

- Dr. Deshmukh S.J., "E-Research Methodology, Shree Niwas Publication 2011, Chapter 6, Pg. 76-96.
- Dr. Upagade Vijay, Dr. Shende Arvind, 'Research Methodology', S. Chand Publication, New Delhi, 2009, First Edition, Chapter 1, 2, Pg. 1 - 25.
- Ellwood, D.T. and Kane, T.J., "Who Is Getting a College Education? Family Background and the Growing Gaps in Enrollment", Securing the Future: Investing in Children from Birth to College, ed. Danziger and J. Waldfogel, New York: Russell Sage Foundation, 2000.
- Mayer Susan, 'What Money Can't Buy: Family Income and Children's Life Chances'.
- Aughinbaugh A, Gittleman M., "Does Money Matter? A Comparison of the Effect of Income on Child Development in the United States and Great Britain", Journal of Human Resources, 2003;38(2), pg. 416–440.
- Dahl, G. & Lochner, L. "The Impact of Family Income On Child Achievement," NBER Working Papers 2005, pg. 112-179.
- David P. Ross and Paul Roberts, 'Does Family Income Affect the Healthy Development of Children?', Perception, Volume 21# Summer 1997.
- Frenette, Marc. "Why are Youth from Lower-income Families Less Likely to Attend University?", Evidence from Academic Abilities, Parental Influences, and Financial Constraints, Statistics Canada, Analytical Studies Research Paper Series No. 295, 2007.
- Gordon B. Dahl and Lance Lochner, "The Impact of Family Income on Child Achievement: Evidence from the Earned Income Tax Credit, American Economic Review" 2012, 102(5): 1927–1956, VOL. 102, No. 5, Aug. 2012, Pg. 4-9.
- http://articles.economictimes.indiatimes.com/keyword/human-resource-management
- http://articles.economictimes.indiatimes.com/keyword/economic-growth
- http://www.economist.com/topics/economic-development
- http://articles.washingtonpost.com/keyword/economic-growth
- http://www.journals.elsevier.com/journal-of-development-economics/recent-articles/
- http://www.journals.elsevier.com/journal-of-development-economics/recent-articles/
- www.planningcommisioninindia.com www.humanresourcedevelopment.com
- www.nationalinformationcentre.html www.preventindia.org www.unicef.org/india/wes 209.htm www.indiafacts.in/india-census-2011 www.Healthy_india.org.